# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ११६ वा ❑ भारतीय सौर दिनांक २६ ज्येष्ठ शके १९४८, मंगळवार दि.१६ जून २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## उघड्या विहिरी बनताहेत मृत्यूचे सापळे!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

महाराष्ट्रात उघड्या विहिरी मृत्यूचा सापळा बनत असून, वाहने कोसळण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे अलीकडेच सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात तांदूळवाडी गावाजवळ भाविकांनी भरलेली पिकअप गाडी थेट उघड्या विहिरीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात ८ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि ७ जण जखमी झाले आहेत.

राज्यात वाढत्या अपघातांच्या मालिकेत आणखी एक अत्यंत दुर्दैवी घटना समोर आली आहे. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी परिसरात कार विहिरीत कोसळून नऊ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

महाराष्ट्रात उघड्या विहिरी मृत्यूचा सापळा बनत असून, वाहने कोसळण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात तांदूळवाडी गावाजवळ भाविकांनी भरलेली पिकअप गाडी थेट उघड्या विहिरीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघात होऊन ८ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि ७ जण जखमी झाल्याने राज्यात खळबळ निर्माण झाली आहे

वाढत्या अपघातांमुळे वाहने थेट विहिरीत कोसळण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. महाराष्ट्रात विशेषतः सोलापूर (तांदुळवाडी) आणि नाशिक (दिंडोरी) या भागांत अशा अनेक दुर्दैवी दुर्घटना समोर आल्या आहेत, ज्यात निष्पाप जीवांचा बळी गेला आहे.

धक्कादायक बाब म्हणजे या आधी देखील वाहने विहिरीत पडून अनेकांचा दुर्दैवी मृत्यू झाला,मात्र अजून पावेतो शासन व स्थानिक प्रशासनाला जाग आली नाही.ग्रामीण भागात किंवा शेतात असलेल्या विहिरींवर जाळी किंवा भिंत उभारण्याबाबत नियमांची कडक अंमलबजावणी होत नाही.ग्रामीण रस्ते आणि महामार्गांलगत असलेल्या विहिरींना सुरक्षा कठडे (कंपाउंड) नसतात.चालकाचे नियंत्रण सुटले की अपघात होतो.रात्रीच्या वेळी अंधार, खराब रस्ते किंवा वेगमर्यादेचे उल्लंघन यामुळे चालकाचा ताबा सुटून वाहने थेट शेजारील विहिरीत कोसळतात.याकडे स्थानिक शासन व प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

विहिरीत पाणी असल्याने वाहनातील प्रवाशांना बाहेर पडणे कठीण होते, ज्यामुळे गुदमरून किंवा बुडून मोठ्या प्रमाणावर लोकांचा मृत्यू होतो.

प्रत्येक विहिरीभोवती किमान ३ ते ४ फूट उंचीची पक्की भिंत किंवा सुरक्षित लोखंडी जाळी असणे बंधनकारक करावे. दिशादर्शक फलक लावावा. धोकादायक वळणावर आणि विहिरींच्या आधी रस्त्यावर स्पष्ट इशारा देणारे फलक  लावणे गरजेचे आहे.स्थानिक पातळीवर अशा धोकादायक विहिरींचा सर्व्हे करणे आणि शेतकरी किंवा मालकांना सुरक्षा उपाय करण्यास भाग पाडणे आता काळाची गरज बनली आहे.

रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत महामार्गालगतच्या अशा धोकादायक विहिरी व खड्ड्यांचे सर्वेक्षण करून तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

रस्त्यांच्या निर्मितीसोबतच प्रवाशांची सुरक्षाही तेवढीच महत्त्वाची आहे. या जीवघेण्या विहिरींचे लवकरात लवकर आच्छादन किंवा भक्कम कठडे करणे ही काळाची गरज आहे. गावातील नागरिकांनी. उघड्या  विहिरी स्थानिक प्रशासनाला निर्दर्शनास आणून द्यायला पाहिजे. दिलेल्या धोकादायक रस्त्यांवर तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.स्थानिक प्रशासनाने अशा उघड्या विहिरींचे सर्व्हेक्षण करून तातडीने कठडे उभारले, तरच या मृत्यूच्या विहिरी रोखता येतील.

# शाळेतील पहिल्या दिवशी बालगोपालांचे धूमधडाक्यात स्वागत

## पिंपरी चिंचवड मनपा शाळेतील विद्यार्थ्यांचे स्वागत विशेष पद्धतीने

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – पिंपळे सौदागर येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळा क्रमांक ५१ मध्ये पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. सोमवार दि. १५ रोजी शाळेच्या वतीने मुख्याध्यापिका सुरेखा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्यांदा शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पावलांचे गुलाबाच्या पाकळ्यांच्या पार्श्वभूमीवर कुंकुवाच्या पाण्यात बुडवून ठसे घेण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी प्रभागातील राष्ट्रवादीचे नगरसेवक विठ्ठल नाना काटे, भाजपाच्या



नगरसेविका,  डॉ. कुंदा भिसे, अनिता काटे तसेच सामाजिक कार्यकर्ते संजय भिसे यांना निमंत्रित करण्यात आले होते. पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात येऊन खाऊ साठी बिस्किटांचे पुडे देण्यात आले. विशेष म्हणजे शाळेच्या पहिल्याच दिवशी मुलांना पुस्तके आणि गणवेशाचेही वाटप करण्यात आले. पोषण आहारात लापशी देण्यात आली. शाळेच्या परिसरात पर्यावरणाच्या दृष्टीने वृक्षारोपणही करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन हनुमंत माने यांनी केले. श्यामल दौंडकर यांनी आभार मानले. शाळेमध्ये विद्यार्थ्यांची संख्या चारशेच्यावर असून गेल्या सात – आठ  वर्षांपासून दरवर्षी विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी विशेष पद्धतीने स्वागत करण्यात येत असून त्यासाठी सर्व शिक्षकवृंदांचे सहकार्य मिळत असल्याची माहिती मुख्याध्यापिका सुरेखा जोशी यांनी दिली.

## परिवर्तनाची मशाल हाती घेऊया...

**ज्योतिर्मय साहित्य**

एक कर्तव्यदक्ष अधिकारी जेव्हा व्यवस्थेच्या भिंतींना तडे देत लोकहिताचा मार्ग निवडतो, तेव्हा सामान्य माणसाला त्यात स्वतःच्याच स्वप्नांचं प्रतिबिंब दिसू लागतं. जेव्हा प्रामाणिक, धाडसी आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांचा विषय निघतो, तेव्हा तुकाराम मुंढे यांचं नाव आदराने घेतलं जातं. भ्रष्टाचाराला न जुमानणारे, नियमांचे काटेकोर पालन करणारे आणि जनहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारे अधिकारी म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण झाली आहे. त्यांच्या याच निर्भीड वृत्तीमुळे आज अनेकांना मनापासून वाटतं की आपल्या शहरात, आपल्या कार्यालयात आणि आपल्या व्यवस्थेत एक तरी तुकाराम मुंढे असायला हवा.

पण या कौतुकाच्या गर्दीत एक प्रश्न मात्र कायम अनुत्तरित राहतो. आपल्याला तुकाराम मुंढे हवेत, पण त्यांच्या अंगी असलेले गुण स्वतःमध्ये रुजवावेत असं का वाटत नाही? आपण भ्रष्टाचाराचा निषेध करतो, पण स्वतःची



कामे लवकर व्हावीत म्हणून शिफारशी शोधतो. नियम मोडणाऱ्यांवर टीका करतो, पण स्वतःच्या सोयीसाठी नियमांकडे दुर्लक्ष करतो. समाजातील अन्याय पाहून संताप व्यक्त करतो, पण अन्यायाविरुद्ध उभं राहण्याची वेळ आली की शांत राहणं पसंत करतो. आपल्याला प्रामाणिक अधिकारी हवा असतो, परंतु प्रामाणिक नागरिक होण्यासाठी लागणारी किंमत मोजण्याची तयारी मात्र नसते.

खरं तर तुकाराम मुंढे हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नाहीत; ते एका विचाराचं, एका मूल्यव्यवस्थेचं प्रतीक आहेत. त्यांच्यातील शिस्त, निस्वार्थीपणा, धैर्य, जबाबदारीची जाणीव आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी हेच त्यांचं खरं सामर्थ्य आहे. या गुणांची प्रशंसा करणं जितकं सोपं आहे, तितकंच त्यानुसार जगणं कठीण आहे. कारण त्यासाठी स्वतःच्या स्वार्थावर नियंत्रण ठेवावं लागतं, लोकप्रियतेपेक्षा सत्याची साथ द्यावी लागते आणि सोयीपेक्षा कर्तव्याला महत्त्व द्यावं लागतं.

कोणतीही व्यवस्था एका व्यक्तीच्या बळावर बदलू शकत नाही; ती बदलते जेव्हा सामान्य नागरिक आपल्या हक्कांसोबतच आपल्या कर्तव्यांचीही जाणीव ठेवतो. प्रशासन जबाबदार असणं जितकं गरजेचं आहे, तितकंच नागरिकांचं सजग, प्रामाणिक आणि उत्तरदायी असणंही आवश्यक आहे. त्यामुळे चांगल्या व्यवस्थेची अपेक्षा करण्यापूर्वी चांगला नागरिक बनण्याचा प्रयत्न करणं अधिक गरजेचं आहे.

आज समाजाला आणखी एका तुकाराम मुंढेंची गरज नाही; गरज आहे प्रत्येक नागरिकाच्या मनात एक तुकाराम मुंढे जागा होण्याची. ज्या दिवशी आपल्यातील सजग नागरिक जागा होईल, त्या दिवशी परिवर्तनासाठी कोणत्याही नायकाची वाट पाहावी लागणार नाही. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात प्रामाणिकपणाचा एक छोटासा दिवा पेटवला, नियमांचे काटेकोर पालन केले आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी जपली, तर परिवर्तनाची मोठी मशाल आपोआप प्रज्वलित होईल. कारण खरा बदल हा एखाद्या व्यक्तीकडून नव्हे, तर जागृत नागरिकांच्या सामूहिक कृतीतूनच घडत असतो.




*मंगेश दौंडकर, पुणे,*
*मो.- 9890619354*


## असा हा पाऊस....

**ज्योतिर्मय साहित्य**


पाऊस शब्द उच्चारताच डोळ्यासमोर येते ते बालपण. पावसात भिजून घरी येण्याचा आनंद, कागदाची होडी पाण्यावर सोडून तीचे निरीक्षण. अशा एक ना अनेक अविस्मरणीय आठवणी आहेत. साहित्यिकांना पाऊस ही एक पर्वणीच असते. खूप कविता, गीते, लेख पावसावर लिहिलेली आहेत. ‘‘येरे येरे पावसा, तुला देतो पैसा, पैसा झाला खोटा पाऊस आला मोठा‘‘ हे गीत गात गातच आम्ही लहानचे मोठे झालो. या गीतात बालमनातील सुप्त भाव अचूक टिपला आहे.



पावसासंबंधी आपल्या कल्पकतेने अनेक कवींनी व लेखकांनी त्याला उपमा दिल्या आहेत. मुसळधार, कोसळधार, अवकाळी, मृगधारा, अमृतधारा, इ. हा पाऊस फार अवखळ आहे. जेव्हा त्याची सगळेजण वाट पाहतात तेव्हा तो हुलकावणी देतो आणि कधी हा पाऊस सतत पडत राहतो अगदी कंटाळा येईपर्यंत, थांबायचे नाव घेत नाही. पावसाळ्यातील वातावरण, पक्षी आणि प्राणी यांच्यावर पावसाचा परिणाम, नदी, नाले, समुद्र यांना आलेली भरती याचा आवर्जून उल्लेख कवितेत तसेच लेखात साहित्यिकांनी केला आहे. मंगेश पाडगावकर यांनी ‘‘सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल काय‘‘ या खूप लोकप्रिय कवितेत मुलांना पाऊस पडून शाळेला सुट्टी मिळावी अशी आंतरिक इच्छा अधोरेखित केली आहे. ‘‘गडद निळे गडद निळे, जलद भरून आले‘‘. असे पावसापूर्वीच्या वातावरणाचे वर्णन कवी बा.भ.बोरकर यांनी केले. ‘‘पाऊस पहिला, जणू  कान्हूला‘‘ हे प्रसिद्ध गीत प्रवीण दवणे यांचे. यात त्यांनी पहिल्या पावसाचे वर्णन केले आहे. ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके यांनी लिहिलेली ‘‘पावसाच्या धारा येती झरझरा, झाकलेले नभ सोसाट्याचा वारा‘‘ ही कविता सर्व मुलांची पाठ असायची. पावसाळ्यातील हिरव्या ऋतूचे सुंदर शब्द वर्णन केले. ‘‘ऋतू हिरवा, ऋतू बरवा..‘‘ या गीताची निर्मिती त्यांनी केली. ‘‘देवा पाऊस पाऊस, तुझ्या डोयातले आस.‘‘ असं ज्येष्ठ कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी आपल्या बोलीभाषेत आगळ वेगळ जणू चिंतनचं मांडलं आहे. खरचं आहे ते.आमची शेती पावसावरच अवलंबून आहे. बळीराजाच्या सर्व आशा आकांशा म्हणजे समाधानकारक पाऊस. ‘‘बाई या पावसानं लाविली झिमझिम‘‘ अशी मार्मिक कविता कवी अनिल यांनी लिहून पावसाळ्यातील वस्तुस्थिती मांडली. पाऊस पडण्याचा आनंद तर आहेच पण त्यानंतर रस्त्यात चिखल होणे, कामासाठी बाहेर पडता न येणे अशा समस्यांना तोंड द्यावे लागते. हा पाऊस तसा लहरी आहे.कधी आकाशाकडे डोळे लावून बसावे लागते तर कधी अतिवृष्टी झाल्याने तो थांबवण्यासाठी देवाकडे नवस बोलले जातात. ‘‘घन घन माला नभी दाटल्या कोसळती धारा‘‘. हे एक गदिमांचे सुंदर चित्रपट गीत. ‘‘श्रावण मासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे ‘‘ ही बालकवींची कविता ऐकल्या शिवाय पावसाळा पूर्णच होऊ शकत नाही. असा हा पाऊस... प्रत्येक कवीला आपापल्या शब्दात तो गुंफण्याचा मोह आवरला नाही. थोडक्यात एवढेच म्हणावे वाटते.

कधी दिवसा येतो कधी रात्रभर येतो
आनंदाची एकच गोष्ट तो चैतन्य घेऊन येतो.
असा हा पाऊस...

***




अरविंद कुळकर्णी
(सेवानिवृत्त गणित शिक्षक)
भ्रमण. - ९८२२६४२२९४











# जात्यावरच्या ओव्या......

आल भरून आभाळ
थेंब पावसाचे आले
माती झाली सुवासिक
मोर थुईथुई नाचले ||६९३||

आल भरून आभाळ
पाखरं लपली खोप्यात
पंखाखाली घेती पिलं
पाणी पडतो रानात ||६९५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ३९




ज्योतिर्मय साहित्य

संत तुकाराम महाराज म्हणतात, ''ठेविले अनंते तैसेची राहावे, चित्ती असू द्यावे समाधान.'' हे आपल्याला कळते पण वळत नाही आणि आपला सुखाचा आणि समाधानाचा शोध सुरूच राहतो. प्रत्येक परिस्थितीत आपली सुखाची आणि समाधानाची व्याख्या बदलत जाते. मला नोकरी लागली म्हणजे मी सुखी होईल, माझ्या पगारात वाढ झाली म्हणजे मी सुखी होईल, माझ्याकडे आज जी चारचाकी आहे, उद्या त्यापेक्षा आणखी चांगल्या प्रकारचे वाहन आले म्हणजे मला समाधान लाभेल. आणखी जमीन, आणखी घरे, बंगले यासारख्या गोष्टी माणूस मिळवण्यासाठी माणूस धडपड करतो आणि त्यासाठी आयुष्यभर धाव धाव धावतो. परंतु त्याची हाव संपत नाही. कुठे थांबायचे हे त्याला कळत नाही.



एका शेतकऱ्याची गोष्ट फार सुंदर आहे. तो आपल्या शेताच्या बांधावर आरामात झोपला होता. त्याची एका मोक्याच्या ठिकाणी शेतजमीन होती. शहरातून आलेला एक कारखानदार ती जमीन विकत घेऊन तिथे कारखाना काढण्याच्या तयारीत होता. तो त्या शेतकऱ्याला म्हणाला ,''तू मला ही जमीन दिलीस तर मी तुला भरपूर पैसे देईन. तू श्रीमंत होशील.'' शेतकऱ्यांनी विचारले,''भरपूर पैसे मिळाल्यावर आणि श्रीमंत झाल्यावर काय होईल ?'' जमीनदार म्हणाला,''वेडा आहेस का ?अरे, तू अत्यंत समाधानात राहशील.'' शेतकरी म्हणायला,''मग त्यासाठी जमीन विकायची काय गरज आहे ? मी आत्ता देखील समाधानीच आहे.'' एका सामान्य शेतकऱ्याला जी गोष्ट कळली ती आपल्याला कळत नाही.

परमेश्वर प्राप्तीच्या आड जर काही येत असेल तर ते म्हणजे आपले मन ! आपले मन अतिशय चंचल आहे आणि ही गोष्ट सगळ्यांनाच माहिती आहे. म्हणून तर एका गाण्यात म्हटले आहे, '' माझिया मना जरा जरा थांब ना, तुझे धावणे अन् मला वेदना !'' म्हणून समर्थ म्हणतात की आपले हे चांचल्य म्हणजे चंचलता भगवंताला अर्पण करून आपली चित्त त्याच्याकडे केंद्रित करावे. त्याचे ध्यान लागावे.

गीतेत भगवंत म्हणतात ''सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज'' सर्वधर्म म्हणजे आपली सुखदुःखे, कर्म, वासना आदी सगळे भगवंताला अर्पण करून त्याला शरण जावे. तो आनंदनिधान आहे. अक्षय सुख आणि समाधान त्याच्याच ठायी आहे.

स्वसंवाद : १) मी ज्या सुखाच्या शोधात धावत आहे, ते खरोखरच मला समाधान देणारे आहे का? की ही केवळ अंतहीन धावपळ आहे?

२) माझ्या मनातील चंचलता, अपेक्षा आणि असंतोष मी कधी परमेश्वराला अर्पण करण्याचा प्रयत्न केला आहे का?

३) ''समाधान'' ही बाह्य गोष्टींमध्ये नसून अंतर्मनात आहे हे मला खरेच पटले आहे का?

(क्रमशः)




ॐ नमो भद्र हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्र हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्र हनुमते नमः🙏🙏

# || संजय उवाच... ||




@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ कर्तव्य

कर्तव्य ही एक जवाबदारी आहे आपल्याकडील कर्तव्य व्यवस्थित पार पाडणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच असते, जो यापासून दूर पळतो तो आयुष्यात अपयशी ठरतो. म्हणून प्रत्येकाने आपल्या कर्तव्याला टाळू नये.

# नाम आणि प्रेम ही जुळी भावंडे आहेत.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

साधारण प्रापंचिकाची ओढ विषयाकडे असते. आज सुख कशात आहे एवढेच तो बघतो, आणि विषयात तो इतका तल्लीन होतो, की जगालाही तो तुच्छ मानतो. विषय शेवटी दुःखालाच कारणीभूत होतात हे तो विसरतो. विषय आणि मी एक होतो तेव्हा सुख होतेसे वाटते. पण वास्तविक, आजवर कुणालाही विषयाने शाश्वत सुख आणि समाधान मिळालेले नाही. असे सुख आणि समाधान मिळवण्यासाठी आपली वृत्ती भगवंताच्या ठिकाणी स्थिर ठेवणे हा एकच उपाय आहे. वृत्ती नेहमी एकाकार व्हावी, पण ती विषयात न होता नामात व्हावी, हेच सर्व संतांचे सांगणे आहे. ' मना ' ला उलटे केले की 'नाम' हा शब्द तयार होतो. याचा अर्थ असा की, नाम घेणे म्हणजे मनाची विषयाकडे असलेली ओढ उलटी फिरविणे. नाम म्हणजेच ' न मम '. प्रपंच माझा नाही म्हणून करणे म्हणजेच नाम घेणे. मी जितकी प्रपंचाची काळजी घेतो तितकी नामाची घेतो का, याचा प्रत्येकाने विचार करावा. प्रपंचातले आपले कर्तव्य अगदी मनापासून केल्यावर, जी परिस्थिती निर्माण होईल तिच्यामध्ये अत्यंत समाधानाने राहून नामस्मरणात काळ घालवावा.

निर्गुणाला एक जुळे झाले; ते म्हणजे नाम आणि प्रेम. दोन्ही एकमेकांना अतिशय चिकटून आहेत. एकाला धरले की दुसरे त्याच्या मागे येते. आज आपले प्रेम अनेक वस्तूंवर, व्यक्तींवर, पैशावर, विद्येवर, देहावर, लौकिकावर गुंतले आहे. त्या कारणाने, भगवंतावर प्रेम करून त्याच्यामागे नाम येईल अशी आपली अवस्था नाही. गोपींची तशी अवस्था होती. पण आपण नामाला वश करून घेऊ शकतो. ते झाले की भगवंताचे प्रेम आपोआप येईल. घरादारावर प्रेम सहवासाने बसते; मग नामाचा सहवास केला तर प्रेम का लागणार नाही ?


खरोखर, या जगात कुणाच्या बुद्धीला पचविता आल्या नाहीत अशा कितीतरी वस्तू आहेत. मुलाला आपल्या बापाचे बारसे पाहणे जसे शक्य नाही, तसे ' मी कोण आहे ? ' हे बुद्धीने ओळखणे शक्य नाही. खरी सत्य वस्तू कल्पना, बुद्धी आणि तर्क यांच्या पलीकडे आहे. सत्याचा शोध करायचा असेल तर सत्य ज्याने झाकले आहे ती वस्तू दूर करा, म्हणजे सत्य दिसेल. सत्य हे आपल्याला उत्पन्न करता येत नाही; पण उपाधी मात्र उत्पन्न करता येते. उदाहरणार्थ, भीती, कल्पना इत्यादि आपणच उत्पन्न करतो. नदीच्या पुलावर उभे राहिले असता पायाला पाण्याचा स्पर्श न लागता देखील, वाहणाऱ्या पाण्याची मजा अनुभवता येते; त्याचप्रमाणे भगवंताचे सत्यत्व ज्याच्या अंत:करणाला पटले, तो विषयामध्ये राहून देखील, होणाऱ्या सुखदु:खाच्या गोष्टींकडे गंमत म्हणून बघेल आणि त्यापासून स्वत: अलिप्त राहील.

सुख हे विषयात नसून आत्म्यात आहे. आत्मा सुख-रूप आहे.

***

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे



## संत निवृत्तीनाथ महाराज

पुढे.......

या स्थितीत जाणणारा, ज्याविषयी जाणून घ्यायचे तो, व ज्ञान हे तीनही एकरूप होतात. मनाचे मी पण संपलेले असते. अद्वैत स्थिती येते. त्यामुळे सर्वत्र भगवंतच दिसायला लागतो. ही स्थिती आधी अल्पकाळ टिकते.पुन्हा मी पणा जागा झाला तर ते व्यर्थ ठरणारे असते. अशा आत्म प्रभेची दिवाळी अखंड लाभावी या दिव्य स्थितीचा अनुभव म्हणजे दिवाळी साजरी करणे हे ज्ञानेश्वर माऊलींना सांगायचे आहे. केवळ कुमार वयात असणारे ज्ञानेश्वर माऊली त्यांची दिवाळी बद्दलची संकल्पना किती उच्च स्थितीची आहे हे पाहून आपण आश्चर्यचकित झाल्याशिवाय राहूच शकणार नाहीत. आपण सामान्यपणे भौतिक अर्थाने साजरी करणारी दिवाळी अशी साजरी करूच नये असा याचा अर्थ नाही तर शास्वत दिवाळी कोणती त्यासाठी संतांनी काय काय केले म्हणजे दिवाळी साजरी झाली, हे सांगितले. त्या सर्वांचा मागोवा घेऊन अशी दिवाळी साजरी करण्यास आपलेही मन प्रवृत्त व्हावे ही अपेक्षा. तशी पात्रता अंगी यावी म्हणून सर्व संतचरणी विनम्र होऊन प्रार्थना करूयात.

हा भाग इथेच संपवूयात.

जय हरी माऊली




## मानसन्मान कमावून दाखवा

आपल्या या सुखदुःखाच्या तरंगामधे राग द्वेष प्रेम मद, मत्सर हेवा, आपुलकी माया याबरोबर मानसन्मान ही आहे बर का.. म्हणजे असं पटतं का बघा.. कष्ट प्रयत्न केले तर यश मिळते तसेच मान सन्मान मागून मिळत नाही. तो ज्याचा त्याने आप-आपल्या स्वकर्तृत्वातून कमवायचा असतो. यासाठी काही प्रयत्न गुण अंगी बाणवून घ्यावे. जसे सकारात्मकता ठेवली तर आपण आनंदी व सभोवतालच्या लोकांना, घरातील नात्याना व मित्रांना प्रेरणा व आनंद देऊ! ईतराच्या यशात

आनंदात सामील व्हा. ईतरांचे ऐकून घ्या. आपलं इतरांनाही शेअर करा. शिका ती लहान असो, महिला असो सर्वांचे सुखदुःखाचे तरंग सारखे असतात. हे तरंग काही लहानमोठा, गरीबश्रीमंत वा स्त्रीपुरुष पाहत नाही. कोरोना काळात, लॉक डाऊन मधे हे सर्व समजलेच. म्हणून जबाबदार

बनणे सन्मान करणे- गर्व अंहकार दाखविण्यापेक्षा सभ्य वागले तर मानसन्मान मागोमाग येतोच. वचन पाळणे विश्वास जिंकणे या आवश्यक आहेत. क्षमा व रागावर नियंत्रण ठेवले तर या तरंगाचे रूपांतरण मानसन्मान व आदरात होते.

तेव्हा टेक केअर स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग वाचत राहा गूड़ डे.




# डिप्रेशन

ज्योतिर्मय साहित्य


डिप्रेशन किंवा नैराश्य ही केवळ तात्पुरती उदासी नसून ती एक गंभीर मानसिक स्थिती आहे. यामध्ये व्यक्तीला सतत दुःख जाणवणे, कामात रस कमी होणे आणि दैनंदिन आयुष्य जगताना निरुत्साह वाटणे अशी लक्षणे दिसतात. डिप्रेशनची काही मुख्य लक्षणे म्हणजे झोप न येणे किंवा अति झोप येणे, भूक मंदावणे, एकाग्रता कमी होणे आणि स्वतःला दोष देत राहणे.

डिप्रेशनवर काही नैसर्गिक आणि प्रभावी उपाय

औषधोपचारांसोबतच जीवनशैलीत काही बदल केल्यास मनाची स्थिती सुधारण्यास मोठी मदत होते.

१. सूर्यप्रकाश आणि व्हिटॅमिन डी : सकाळच्या कोवळ्या उन्हात किमान १०-१५ मिनिटे बसा. सूर्यप्रकाशामुळे शरीरात सेरोटोनिन () या हार्मोन्सची निर्मिती वाढते, ज्यामुळे मूड सुधारण्यास मदत होते.

२. पौष्टिक आणि संतुलित आहार : तुमच्या आहारात ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स (अक्रोड, अळशी), हिरव्या पालेभाज्या आणि फळांचा समावेश करा. जंक फूड आणि जास्त साखर असलेले पदार्थ टाळा, कारण ते शरीरातील ऊर्जेची पातळी कमी करतात.



३. नियमित दिनचर्या : नैराश्यामध्ये दिवसाचे नियोजन विस्कळीत होते. झोपण्याची, उठण्याची आणि जेवणाची एक ठराविक वेळ निश्चित करा. छोटे-छोटे ध्येय () ठरवा आणि ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करा.

४. योग आणि ध्यान (मेडिटेशन) : योगासने आणि ध्यान केल्याने मानसिक शांतता मिळते. भ्रामरी प्राणायाम किंवा अनुलोम-विलोम सारखे श्वसनाचे प्रकार मज्जासंस्थेला शांत करतात आणि नकारात्मक विचार कमी करण्यास मदत करतात.

५. सोशल कनेक्टिव्हिटी : एकटे राहणे टाळा. आपल्या जवळच्या मित्रांशी किंवा कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधा. तुमचे विचार शेअर केल्याने मनावरचा ताण हलका होतो.

६. पुरेशी झोप : मानसिक आरोग्यासाठी रात्रीची ७ ते ८ तासांची सलग झोप अत्यंत आवश्यक आहे. झोपण्यापूर्वी मोबाईल किंवा स्क्रीनचा वापर कमी करा.

७. छंद जोपासा : तुम्हाला जे आवडते मग ते गाणे असो, बागेत काम करणे असो किंवा वाचन त्यासाठी वेळ काढा. सृजनात्मक कामांमुळे मेंदूला उभारी मिळते.

महत्त्वाची सूचना: नैसर्गिक उपाय हे प्राथमिक अवस्थेत किंवा पूरक म्हणून काम करतात. जर नैराश्याची भावना तीव्र असेल, आत्महत्येचे विचार येत असतील किंवा दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ लक्षणे टिकून असतील, तर

*मानसशास्त्रज्ञ किंवा मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला घेणे अत्यंत अनिवार्य आहे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे (काव्यसंध्या)
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### विरंगुळा

येता कामाचा ताण
विरंगुळा करण्यासाठी मग
करावा थोडा आराम
ठेवून मन शांत
मुखी जपावे खरे
सुंदर राम नाम

जाणूनी घ्यावे सर्वांनी
विरंगुळ्यामध्ये आहे खरा
आनंद लपलेला छान
एकांती सुंदर आठवणीत
अल्लड मन रमता
हरपते माझे भान

# गायीच्या बछड्याला बाटलीने दूध पाजविणारे मामाजी



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

''चुकली या पाडसा गाय हुरू हुरूप आहे'' असे संतांनी लिहून ठेवले आहे पण आपली माता हरवलेल्या एका बछड्याला त्याच्या पालनासाठी स्वतः बाटलीने दूध पाजविणारे मनोज उर्फ मामाजी बोरा यांचे गोपालन कार्य खरोखरच स्तुत्य आहे.

याबाबत विस्तृत माहिती अशी की मनोज उर्फ मामाजी बोरा यांच्या महावीर गोशाळेत पंधरा दिवसापूर्वी १६१ गाईंचा ताफा आला आणि या सर्व गाई लोकांनी कसायाच्या तावडीतून सोडविल्या होत्या आणि त्यांची संगोपनाची जबाबदारी महावीर गोशाळेने घेतली.

या १६१ गाई मध्ये एक छोटे वासरू सुमारे पाच-सहा महिन्याचे गोशाळेत आणण्यात आले. शोध घेता असे लक्षात आले की त्याची माता दुष्टलोजनांनी कापली आणि हे लेकरू आईविना एकटेच राहिले होते, पण या बाळाची म्हणजे बछड्याची आर्त हाक ऐकून मामाजी बोरा त्या बछड्याला रोज गाईचे दूध पाजू लागले.

पाहता पाहता आता या वासराचा एवढा लळा लागला आहे की मामाजी दिसताच हे पाडस त्यांच्याभोवती फिरू लागते आणि त्यांना चाटू लागते त्याला जो आनंद होतो तो त्याच्या मातेच्या प्रेमाचा होतो.

वात्सल्य सिंधू आई करुणामय आई तू कुठे आहेस मी तुला कुठे हाक मारू असा प्रश्न विचारणाऱ्या त्या पाडसाचे दुःख मामाजीला कळले म्हणून ते रोज बाटलीने दूध पाजून त्याचे संगोपन करत आहे. आई म्हणून आता कोणास या त्या पाडसाचे प्रश्न मामाजीला कळले आणि त्यांनी त्याला रोज बाटलीतून दूध द्यायला सुरुवात केली अशी आहे गो पालनाची ही हृदयाला पीळ पाडणारी कहाणी.

**डॉ प्रा. वि. ल. धारूरकर,**
**छत्रपती संभाजीनगर**

# सिद्धी डेरे यांची डॉक्टरकी परिक्षा सिद्धीस



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सातारा : मनातली स्वप्नं आणि दूरदृष्टी विचार असले की यश हमखास मिळते त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावीच लागते तर आणि तरच मनातलं स्वप्न सत्यात उतरते. याच विचारांतून एमबीबीएस परिक्षा उत्तीर्ण झालेल्या कु सिद्धी यांचे कौतुक होताना दिसत आहे.

कु. सिद्धी वैशाली संजय डेरे मु पो कवठे ता.वाई सध्या पुणे येथे वास्तव्यास असून त्यांनी एमबीबीएस डॉक्टर परिक्षा यशस्वीरीत्या पूर्ण करून घवघवीत यश मिळवले.

वाई तालुक्यातील कवठे हे महाराष्ट्रातील एक महान स्वातंत्र्य सेनानी, समाजसुधारक आणि सहकार चळवळीचे प्रणेते असणाऱ्या किसनवीर आबांचे गावं.

पुणे बंगळूर महामार्ग याच गावामधूनच गेला असल्याने दळणवळणाची सोय असली तरी हा भाग भौगोलिकदृष्ट्या कमी पाणस्थळ जमीनीचा, त्यामुळे जो तो आपल्या भविष्यमय वाटचालीसाठी शैक्षणिक कंदिल प्रकाशमय करण्यासाठी झटलेलाच.


श्री संजय डेरे हे उत्पादन शुल्क विभागात एक जबाबदारीच्या पदावर कार्यरत व आई सौ वैशाली डेरे या गृहिणी असल्याने मिळालेला वेळ आपल्या पाल्यावर चांगले संस्कार, चांगले विचार बिंबवले तर त्यांच भविष्य सुंदर व्हायला वेळ लागणार नाही आणि त्याच इच्छाशक्तीच्या जोरावर कु सिद्धी यांनी हे यश प्राप्त केले आहे.

लहानपणापासूनच आभ्यासू असणाऱ्या सिद्धीला स्वताची ओळख निर्माण करायची होती, त्यासाठी तिने अथक परिश्रम आणि येणाऱ्या प्रत्येक परिस्थितीत समतोल साधत योग्य प्रकारे आपला मार्ग चोखाळत राहिली.

मेडिकल कॉलेज मध्ये प्रवेश घेतल्यानंतर आज ती डॉक्टर होईपर्यंत आपल्या स्वप्नांना कवेत घेण्याच जणू काही तिने विडाच उचलला होता असे उद्‌गार यावेळी सिद्धी यांचे चिंधवली येथील मामा श्री किरण पवार यांनी काढले.

या नेत्रदीपक यशाबद्दल परिवारामध्ये पहिली डॉक्टर झाल्याने कवठे आणि चिंधवली परिवासाठी हा आनंददायी क्षण ठरला.

*दिपक पवार, चिंधवली.*



# प्राचार्य डॉ.मोहरकरांच्या लालगुंजीला राज्यस्तरीय वाङ्‌मय पुरस्कार

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

चंद्रपूर : येथील प्रसिद्ध साहित्यिक प्राचार्य डॉ.श्याम मोहरकर यांच्या लालगुंजी कादंबरीला सातारा येथील कुंडल- कृष्णाई प्रतिष्ठानचा कादंबरी साहित्य प्रकारातील उत्कृष्ट वाङ्‌मय प्रथम पुरस्कार -२०२६ नुकताच प्रदान करण्यात आला.

यावेळी प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष हणमंतराव जगदाळे, सचिव सावित्री जगदाळे आणि कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.या कादंबरीला यापूर्वी झाडीबोली साहित्य मंडळ साकोलीचा उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार ३३ व्या झाडीबोली साहित्य संमेलनात प्रदान करण्यात आला होता.हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल वि. सा. संघ, गोंडवन शाखेचे अध्यक्ष श्याम हेडाऊ, सचिव, डॉ. परमानंद बावनकुळे, सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, आशिष देव, डॉ.धनराज खानोरकर, डॉ.जनबंधू मेश्राम, नाटककार चुडाराम बल्लारपूरे, डॉ.माधवी भट, डॉ. नागलवाडे, डॉ. राम वासेकर डॉ. सविता गोविंदवार यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

# चैतन्य गायन कट्टा व ओंजळ ग्रुप तर्फे स्कुल बॅग, शालेय साहित्य व बिस्कीट-खाऊचे वाटप

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

बालेवाडी दसरा चौक पुणे : दिनांक-१५जून२०२६ रोजी सामाजिक नेते श्री. राहुल दादा बालवडकर निर्मित चैतन्य गायन कट्टा, फ्रेंडस ऑफ ट्रायबल सोसायटी व ओंजळ ग्रुप यांच्या सौजन्याने शबरी वस्तीतील संगणक प्रशिक्षणार्थ्यांना स्कुल बॅग, शालेय उपयोगी साहित्य व बिस्कीट व खाऊचे वाटप करण्यात आले. याच कार्यक्रमात संगणक प्रशिक्षकांचा बॅग देऊन सत्कार केला. कार्यक्रमात प्रशिक्षिका अदित्ती अव्हाड, प्रांजली, अंजली यांनी आपले मनोगत व प्रशिक्षण अनुभव व्यक्त केले. संगणक प्रशिक्षणाचा कार्यक्रम श्रीभगवती सेवा आश्रम, जीवन कौशल्य विकास आणि फ्रेंडस,ऑफ ट्रायबल सोसायटी,पुणे चॅप्टर यांच्या संयुक्तीक विद्यमाने घेण्यात येतो. सामाजिक कार्याचे उर्जा स्त्रोत, मार्गदर्शक व आधारवड श्री.अशोकजी नवाल सर यांनी समयोचित विचार व्यक्त केले. यानंतर शंखश्री चंद्रकांत जाधव पाटील यांनी शंखध्वनीचे मानवी जीवनातील व सांस्कृतिक महत्व सांगून कार्यक्रमाचे नियोजन चैतन्य गायन कट्ट्याचे सर्वो सर्वा श्री प्रदिपरावजी देशपांडे व त्यांचे सहकारी नरेश शास्त्री, हरेश मेहता यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व निवेदन डॉ.श्याम कुलकर्णी तर आभार प्रदर्शन गिरीधर राठी यांनी केले. कार्यक्रमास सर्वश्री दयानंद चिखलकर, श्री प्रकाश दादा बोकील, सतिशराव पाठक, अनिल बालवडकर, निलीमाताई देशपांडे, आशाताई शास्त्री,जागृती निखारे व गायन कट्ट्यातील बहुसंख्य गायक व गायिका उपस्थित होत्या.




## सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

# स्वच्छता हीच सेवा आणि स्वच्छता हाच धर्म - शिवशंकर मुंडे यांचे प्रतिपादन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजी नगर : स्वच्छता हीच मानवी सेवा आहे आणि स्वच्छता हाच मानवी धर्म आहे असे विचार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते आणि शालिवाहन शाखेचे कार्यवाह शिवशंकर मुंडे यांनी प्रतिपादन केले ते शालिवाहन प्रभातच्या स्वच्छता मोहीम प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानी संघाचे मुख्य शिक्षक श्री साहेबराव धनवटे हे होते. याप्रसंगी एन थ्री एन फोर तसेच एन टू परिसरातील संघाचे प्रमुख कार्यकर्ते आणि स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक १२ जून रोजी शालिवाहन प्रभातच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली याप्रसंगी झाडू हातमोजे आणि सर्व स्वच्छता साधनांची उपलब्धता करून देण्यात आली.

शाखेच्या परिसरात विवेकानंद मैदान येथे



स्वच्छता मोहीम राबविण्यात आली तसेच मैदानाच्या आसपास व प्रवेशद्वाराच्या उजव्या व डाव्या बाजूस सुद्धा स्वच्छता अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी कचरा व्यवस्थापन टाकाऊ वस्तुचे संकलन आणि एकत्रीकरण करून परिसर स्वच्छ करण्यात आला.

नित्य शाखा परिसर झाडून स्वच्छ करणारे स्वच्छता दूत श्री गोरख शिरसे यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली याप्रसंगी प्रामुख्याने डॉ गणेश महाजन, मोहन कुलकर्णी, शिवाजीराव तुपे, अशोकराव पाखरे, डॉ. श्याम सुंदर कुडे तसेच

अनंत कुलकर्णी, अनिलजी देशमुख, हेमंत धर्माधिकारी, शाहूराज कांबळे, सामाजिक कार्यकर्ते न्याय नगर तसेच डॉ. श्री रामदास सपकाळ तसेच भास्कर सखाराम मुंडे मा.न्यायमूर्ती श्रीराम कुलकर्णी, एडवोकेट संचित सुधाकरराव पातुरकर आणि पंडितराव कुलकर्णी, सुनील कुमार मेघनाथ सूद, एकलव्य प्रभात चे प्रशांत बक्षी व अन्य उपस्थित होते याप्रसंगी एन २ केशव प्रभात शाखेचे जेष्ठ कार्यकर्ते डॉ. विजय जोग तसेच डॉ विल धारूरकर, जयकुमार कुटे तसेच श्रीधर भाले विष्णू मुळे नारायण घुगे हेही उपस्थित होते



# गोपाळ गणेश आगरकर

## एक दुर्लक्षित समाज सुधारक

(आगरकर २४ जुलै-१८५६-१७ जुन१८९५)

✍️मोहिनी किन्हीकर हेडावू मो. 98229 40912

राजकीय चळवळी म्हटले तर टिळक आठवतात! तर सामाजिक चळवळी म्हटले की आगरकर..!!

समाज सुधारक म्हटले की महात्मा फुले, डॉक्टर आंबेडकर, शाहू महाराज यांचा उल्लेख होतो. मात्र त्यात आगरकर कुठेच नसतात, ह्याची खंत वाटते.

आगरकर ह्यांचे शिक्षण एम.ए. पर्यंत झाले होते. ते हयात असे पर्यंत फर्ग्यूसन कॉलेजचे प्राचार्य होते. माधुकरी करून आणि लेखन व वक्तृत्व स्पर्धेत मिळणाऱ्या पुरस्काराने त्यांनी त्यांचे शिक्षण केले. धर्मनिरपेक्षता, विवेकवाद, व्यक्तिस्वातंत्र्य,सामाजिक न्याय, पुरोगामी, विज्ञानवादी दृष्टिकोन ह्यावर आधारित त्यांचं तत्वज्ञान होते.


इंटेलुकच्युअल डिबेट इज इसेंशिअल टू सोसिअल हेल्थ., असे त्यांना वाटे.

न्यू इंग्लिश, डेक्कन कॉलेज एज्युकेशन सोसायटी, फर्ग्युसन कॉलेज यांच्या स्थापनेत टिळकांसोबत आगरकरांचा ही मोठा हात होता. टिळकांनी आणि आगरकर यांनी केसरी आणि मराठा वृत्तपत्र सुरू केले. त्यात केसरीचे पाहिले संपादक आगरकर होते. त्यांनी सोबतच डोंगरी येथील तुरंगात 101 दिवस काढले.

आधी राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा ? याबाबत दोघांची मते भिन्न होती. वैचारिक मतभेद होते. टिळकांना असे वाटत होते की आधी राजकीय स्वातंत्र्य मिळणे, सत्तापरिवर्तन होणे महत्त्वाचे आणि एकदा सत्तापरिवर्तन झाले की सामाजिक सुधारणा आपसूकच होऊ लागतील. परंतु याबाबत आगरकरांचे विचार वेगळे होते. त्यांना समाज सुधारण्याचे जास्त महत्त्व वाटत होते.

आज स्वातंत्र्याच्या 78 वर्षांनंतर देखील समाज सुधारणेचे महत्त्व कमी झालेले नाही. किंबहुना ते वाढलेले आहे. राजकीय स्वातंत्र्य मिळाले परंतु समाजसुधारणा फार हळू हळू होत गेल्या. राजकीय स्वातंत्र्य मिळण्यात बरेचदा क्रांती अपेक्षित असते. तसेच समाज सुधारणे मध्ये होत नाही, कारण समाज पुरुष हा झोपलेला असतो. त्याला हळूहळू जागे करावे लागते. लोकांचे मतपरिवर्तन करावे लागते.. इथ पर्यंतचे म्हणजे टीळकांसोबत काम केलेले आगरकर आपल्याला माहिती असतात.

क्रमशः........




## सोमवार, १५ जून २०२६:

### ♦ पाचवे नक्षत्र - मृगशीर्ष नक्षत्र

रविवारी रात्री रोहिणी नक्षत्र संपून सोमवारी सूर्योदयाच्या वेळी मृगशीर्ष नक्षत्र असेल. या नक्षत्राचे पहिले दोन चरण वृषभ राशीत आणि नंतरचे दोन चरण मिथुन राशीत येतात. याचा स्वामी मंगळ आहे आणि याचे दैवत 'सोम' (चंद्रदेव/अमृत) आहेत. याचे प्रतीक 'हरणाचे डोके' आहे.

■ संस्कृत श्लोक:

चपलो चतुरो भीरुः पटुरुत्साही धनी क्षमी।
मृगशीर्षे भवेन्मर्त्यो संगीतज्ञो विलासवत्॥

शोध आणि कुतूहल: हरणाप्रमाणेच या नक्षत्राची मूळ ऊर्जा 'शोध' ही आहे. नवीन गोष्टी जाणून घेणे, संशोधन करणे किंवा प्रवास करणे यासाठी हा दिवस उत्तम आहे.

■ चपळता आणि बुद्धिमत्ता: या दिवशी बुद्धी खूप वेगवान आणि चपळ काम करते. मानसिक कामांमध्ये यश मिळते.

■ सोमवार आणि मृगशीर्ष योग: सोमवारचा स्वामी चंद्र आहे आणि मृगशीर्ष नक्षत्राचे देवही 'सोम' (चंद्र) आहेत. त्यामुळे हा दिवस मनाला अत्यंत प्रसन्नता आणि शांती देणारा ठरेल.

■ काय करावे?: कला, संगीत, प्रवास, नवीन मैत्री करणे आणि शिक्षणाची सुरुवात करण्यासाठी उत्तम दिवस.

■ काय टाळावे?: हरणासारखा मनाचा अस्वस्थपणा किंवा संशयी वृत्ती वाढू शकते, त्यामुळे कोणताही निर्णय घेताना मन स्थिर ठेवावे.

१३ जून रोजी कृष्ण पक्षातील त्रयोदशी तिथी आहे.
त्यानुसार, १४ जून रोजी चतुर्दशी असेल.
आणि १५ जून २०२६ (सोमवार) रोजी अमावस्या तिथी असेल.
विशेष म्हणजे, सोमवारी येणाऱ्या अमावस्येला 'सोमवती अमावस्या' म्हणतात, जी हिंदू धर्मात अत्यंत पवित्र आणि शुभ मानली जाते!


■ (अमावस्या महत्त्व):

अमावस्यां तु यः कुर्यात् स्नानं दानं जपमथापि वा।
पितृणामक्षयं तृप्तिं लभते नात्र संशयः॥

■ पितृ तर्पण आणि दान: सोमवती अमावस्येच्या दिवशी पितरांचे स्मरण करणे, पांढऱ्या वस्तूंचे (उदा. तांदूळ, दूध, पांढरे कपडे) दान करणे अत्यंत फलदायी मानले जाते. यामुळे पितृदोष शांत होतो.

अश्वत्थ प्रदक्षिणा (पिंपळाची पूजा): या दिवशी विवाहित महिला आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि घरातील समृद्धीसाठी पिंपळाच्या झाडाची पूजा करतात आणि त्याला १०८ वेळा प्रदक्षिणा घालतात.

त्यामुळे १५ जून हा दिवस सामान्य अमावस्या नसून 'सोमवती अमावस्या' आणि 'मृगशीर्ष नक्षत्र' यांचा अतिशय सुंदर योग असलेला विशेष दिवस आहे!




## मंगळवार, १६ जून २०२६

### ♦ सहावे नक्षत्र - आर्द्रा नक्षत्र

सोमवारी रात्री मृगशीर्ष नक्षत्र संपून मंगळवारी सूर्योदयाच्या वेळी आर्द्रा नक्षत्र असेल. हे नक्षत्र पूर्णपणे मिथुन राशीत येते. याचा स्वामी राहु आहे आणि याचे आराध्य दैवत भगवान शिवांचे उग्र रूप 'रुद्र' आहेत. याचे प्रतीक 'अश्रूचा थेंब' किंवा 'हिरा' आहे.

■ संस्कृत श्लोक:

शठो गर्वी कृतघ्नश्च हिंस्रः पापरतस्तथा।
आर्द्रायां जायते मर्त्यो धूर्तः सोद्वेगवान् भवेत्॥

(टीप: जुन्या श्लोकात याचे उग्र गुण दिले असले, तरी आधुनिक काळात हे नक्षत्र प्रचंड मानसिक ताकद आणि यशाचे प्रतीक मानले जाते.)

■ भावनिक वादळ आणि शुद्धीकरण: अश्रूचा थेंब जसा मनातील दुःख हलके करतो, तसेच हे नक्षत्र आयुष्यातील जुने अडथळे दूर करून नवीन बदलांना स्वीकारण्याची ताकद देते. सुरुवातीला हा दिवस थोडा संघर्षाचा वाटू शकतो, पण शेवट गोड होतो.

■ तडजोड न करणारी शक्ती: रुद्राच्या प्रभावामुळे आजच्या दिवशी लोकांमध्ये कमालीची ऊर्जा आणि जिद्द पाहायला मिळते. कठीण आव्हानांना सामोरे जाण्यासाठी हा दिवस योग्य आहे.

■ काय करावे?: आजच्या दिवशी कायदेशीर बाबी मिटवणे, कॉम्प्युटर/टेक्नॉलॉजीशी संबंधित कामे करणे किंवा घरातून जुना कचरा (आणि मनातून नकारात्मक विचार) काढून टाकणे खूप फायदेशीर ठरेल. शिव उपासना करणे आज सर्वोत्तम राहील.

■ काय टाळावे?: स्वभावात उग्रपणा, रागीटपणा किंवा कोणाचे मन दुखावणारे शब्द बोलणे आज कटाक्षाने टाळावे.

आता आपण आर्द्रा नक्षत्रापर्यंतचा प्रवास पूर्ण केला आहे.

तिथी : आषाढ शुक्ल पक्ष प्रतिपदा
प्रतिपदा म्हणजे महिन्याचा किंवा पक्षाचा पहिला दिवस (पाडवा). या तिथीचे स्वामी अग्नी देव आहेत.

■ (प्रतिपदा तिथी):

प्रतिपद् शुभदा प्रोक्ता सर्वकार्येषु सिद्धिदा।
अग्निपूजारता नित्यं धनधान्यसमृद्धिदा॥

■ आषाढ महिन्याचा प्रारंभ: या दिवसापासून आषाढ महिना सुरू होत असल्याने वारकरी संप्रदायासाठी आणि आध्यात्मिक दृष्टीने हा मोठा दिवस आहे. आषाढ महिन्यातच पंढरपूरची वारी आणि 'आषाढी एकादशी' येते. त्यामुळे भक्तीचा काळ आजपासून सुरू होतो.

नव्या सुरुवातीसाठी उत्तम: प्रतिपदा ही कोणतीही नवीन संकल्पना किंवा धार्मिक व्रत सुरू करण्यासाठी शुभ मानली जाते. कालच्या अमावस्येची नकारात्मकता संपवून आजचा दिवस एका नवीन आणि सकारात्मक ऊर्जेची सुरुवात करतो.

मंगळवार आणि आर्द्रा नक्षत्राचा संयोग: या दिवशी 'आर्द्रा' नक्षत्र आणि 'मंगळवार' आहे. प्रतिपदेचे देव अग्नी आहेत आणि मंगळवारचा कारकही अग्नी तत्त्व आहे. त्यामुळे हा दिवस शरीरात नवीन ऊर्जा, उत्साह आणि जिद्द निर्माण करणारा ठरेल.

या तिथीला काय करावे?

मंगल कार्य किंवा संकल्प: आषाढ महिन्याच्या सुरुवातीला घरात दिवा लावून देव्हाऱ्याची विशेष पूजा करावी. पुढील महिन्यासाठी काही धार्मिक किंवा आरोग्याचा संकल्प करायचा असेल, तर आजचा दिवस उत्तम आहे.

हनुमान किंवा शिव उपासना: मंगळवार आणि आर्द्रा नक्षत्राचे देव 'रुद्र' (शिव) असल्याने आज हनुमान चालीसा पठण करणे किंवा महादेवाला जल अर्पण करणे अत्यंत फलदायी ठरेल.

थोडक्यात सांगायचे तर, १६ जून हा दिवस "नवीन महिन्याची सुरुवात आणि भक्ती रसाचा प्रारंभ" करणारा आहे!

भावले ते लिहिले..
कृतज्ञ मी कृतार्थ मी 🙏
भगवंत हृदयस्थ आहे 🙏

# सहृदयी मित्राची भेट

**ज्योतिर्मय साहित्य**

ई- दै- आधुनिक केसरी, आणि ई दै- ज्योतिर्मय साहित्याचे व्यासपीठ ''या दोन्हींचे संपादक श्री संजय व्यापारी'' यांच्याशी फोनवरून, व्हाट्सअप्प मेसेज मधून संवाद भेटी गेल्या पाच-सहा वर्षापासून होतात.

संजय व्यापारी हे साहित्य आणि साहित्यिक यांच्यावरील प्रेमापोटी संपादक, प्रकाशक झाले आहेत. त्यांच्या बोलण्यातुन हा उद्देश, त्यांची ईच्छा ते मोकळ्या मनाने बोलून दाखवतात. केवळ साहित्य विषयाला वाहिलेल्या ''ई दैनिक ज्योतिर्मयला लेखक, कवी आणि वाचकांचा मिळणारा प्रतिसाद पाहून संपादक-प्रकाशक संजय व्यापारी यांना त्यांच्या परिश्रमाचे सार्थक होत असल्याचे समाधान मिळत असणार ''हे छान वाटणारे आहे. गेल्या वर्षी-२०२५ मध्ये प्रसिद्ध साहित्यिक -पती-पत्नी जोडी- कवी गिरीश, कवयित्री रचना वसेकर यांच्या तीन पुस्तकांचे प्रकाशन पुण्यातील नांदेड सिटी मध्ये झाले. या तीन ही पुस्तकाचे प्रकाशक श्री संजय व्यापारी यांच्या ज्योतिर्मय प्रकाशनाने केले आहे. या प्रकाशन -समारंभात प्रमुख-पाहुणे म्हणून माझा




सहभाग होता. संपादक-प्रकाशक संजय व्यापारी यांच्याशी झालेली ही माझी पहिली समक्ष भेट होती. सकाळच्या नाश्त्याच्या वेळी आम्ही बोलत असतांना संजय म्हणाले- मी तुमचा धाकट्या भाऊ-बाळूचा (अनंतचा) मी शासकीय कला महाविद्यालयातला ''कॉलेजमेंट, आणि अनंतची मिसेस प्रणिता -ही माझी फाईन आर्ट्सची क्लासमेंट आहे. ,ही झाली एक ओळख, दुसरी ओळख- तुमचा लहान भाऊ - किरण - वीणा ही जोडी त्यांच्या ग्राफिक-सेंटरपासून माझ्या ओळखीची आहे.

मित्र हो-

हे संदर्भ १९८५-९५ दरम्यानचे आहेत. आजच्या वर्तमानात माझे हे दोन्हीही धाकटे बंधू -अनुक्रमे-

१.बाळू- बाळासाहेब- अनंत वि. देशपांडे हा

इफमा ''या फाईन आर्ट्स विषयक तीस वर्षे जुन्या इन्स्टिटयूटचा प्राचार्य आहे, आणि प्रणिता अनंत, संचालक आहे.

२. किरणची खरी ओळख त्याच्या ''पंचम ऑर्केस्ट्रा'', व त्याच्या ''के डी प्रेझेंट्स आर डी'', ''सफर गीतों का'' मराठी चित्रगीते'' या स्टेज-शोजचा कलाकार म्हणून जास्त आहे. प्रिंटिंग व्यवसायाला लागणाऱ्या साहित्याचा तो मोठा वितरक होता, ''ग्राफिक सेन्टर'' हे त्याचे बिझनेस ऑफिस सादिया टॉकीजच्या रोडवर होते. किरण -वीणा दोघे यात जोडीने असत. नंतर बजाज इन्शुरन्स, एस बी आय इन्शुरन्समध्ये अधिकारी पदावर यशस्वी कामगिरी करून किरण आता पुण्यात सेटल झाला आहे.

**अरुण वि.देशपांडे-पुणे**
**९८५०१७७३४२**

संजय यांचे मित्र असलेले अनंत (बाळू)- आणि प्रणिता, किरण- वीणा ही दोन्ही जोडपी जेष्ठ नागरिक असून आपापल्या नातवंडांत रमणारे आजी-आजोबा रोलमध्ये आहेत. संजय यांच्या या पारिवारिक मैत्री संदर्भ मुळे एक आपलेपणा आमच्या मैत्रीत नक्कीच आला आहे. फोनवर त्यांच्याशी बोलून मला जाणवले की, संजय म्हणजे खूप छान बोलणारे, शांतपणे- समजून घेत बोलणारे, आपल्या पेपरसाठी लिहिणाऱ्या प्रत्येक साहित्यिकाला लेखन प्रोत्साहन देणारे सहृदयी व्यक्ती - मित्र आहेत. गेल्या आठवड्यात आम्ही पुण्यात - बालगंधर्वला ''भेटलो. या भेटीत त्यांनी माझ्या भावांची आठवण केली, माझ्या साहित्य-लेखनावर मत व्यक्त केले. या तासाभराच्या भेटीत त्यांच्या व्यक्तिमत्वबाबत मी केलेला माझा अंदाज शंभर टक्के खरा निघाला. आमच्या भेटीचा फोटो बालगंधर्व रंगमंदिर इथल्या कलादालन'' समोर काढलाय.

***

# अण्णासाहेब चुडामण पाटील यांच्या 'अजिंक्य' चरित्रग्रंथाचे प्रकाशन

**'अजिंक्य' चरित्रग्रंथातून संघर्ष, नेतृत्व, राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेची प्रेरणा मिळेल**




**ज्योतिर्मय साहित्य**

मुंबई - धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये प्रचंड विकासक्षमता आहे. राज्याच्या विकासाला नवी गती देणारी 'ग्रोथ इंजिन्स' म्हणून या दोन्ही जिल्ह्यांचा विकास करण्याचा शासनाचा निर्धार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. एनसीपीए येथील टाटा थिएटरमध्ये आयोजित माजी खासदार दिवंगत अण्णासाहेब उपाख्य चुडामण पाटील यांच्या 'अजिंक्य' या जीवनचरित्राच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार शोभाताई बच्छाव, आमदार अमरीशभाई पटेल, ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर, सौरभ शुक्ला, विनय सहस्रबुद्धे , कुणाल पाटील, माजी आमदार जयंत पाटील, चित्रा वाघ उपस्थित होते.

**लोकांच्या मनावर राज्य करणारे 'अजिंक्य' नेतृत्व**

अण्णासाहेब सलग तीन वेळा लोकसभेवर निवडून आले. मात्र 'अजिंक्य' ही उपाधी त्यांना केवळ निवडणूक विजयांमुळे मिळालेली नाही. शिक्षण, सहकार, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी उभारलेले कार्य, जोडलेली माणसे आणि लोकांच्या मनात निर्माण केलेला विश्वास हेच त्यांच्या अजिंक्यत्वाचे खरे कारण असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**चांगल्या कार्याचे दस्तावेजीकरण काळाची गरज**

समाजात आदर्श निर्माण करणाऱ्या व्यक्तींचे कार्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्याचे दस्तावेजीकरण होणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. 'अजिंक्य' हा चरित्रग्रंथ केवळ अण्णासाहेबांच्या जीवनाचा आलेख नसून धुळे जिल्ह्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय इतिहासाचाही महत्त्वपूर्ण दस्तावेज आहे, असे त्यांनी नमूद केले.

**धुळे ही 'नररत्नांची खाण'**

धुळे जिल्ह्याने विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणारी अनेक व्यक्तिमत्वे महाराष्ट्राला दिली आहेत. या जिल्ह्यातील क्षमता आणि कर्तृत्व पाहता हा जिल्हा 'नररत्नांची खाण' असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. आमदार अमरीश पटेल यांच्यासारख्या उद्योजकांनी ग्रामीण भागात उभे केलेले विकास मॉडेलही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

**भावी पिढ्यांना प्रेरणा देणारा ग्रंथ**

'अजिंक्य' या चरित्रग्रंथातून संघर्ष, नेतृत्व, राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेची प्रेरणा मिळेल. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी इच्छाशक्ती, दूरदृष्टी आणि समाजहिताची भावना असेल तर मोठे परिवर्तन घडविता येते, हा संदेश अण्णासाहेबांच्या जीवनातून मिळतो. त्यामुळे हा ग्रंथ धुळे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील युवकांसाठी प्रेरणास्रोत ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुणाल पाटील यांनी केले. यावेळी लेखकाच्या पत्नी इंदुमती सोमनाथ पाटील यांचा मुख्यमंत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# ''राघवेवीण गेली''

**ज्योतिर्मय साहित्य**



मनाचे श्लोक भाग ४६ वर केलेले हे विवेचन केवळ वाचनीय नसून अंतर्मुख करायला लावणारे आहे. समर्थांच्या विचारांची अचूक पकड विवेचनात दिसते. समर्थ रामदास स्वामींनी श्लोकात सांगितलेला मूळ गाभा अतिशय सोप्या आणि प्रभावी भाषेत उलगडला आहे. ''राघवेवीण गेली'' म्हणजे केवळ देवाचे नाव न घेणे एवढाच मर्यादित अर्थ न घेता, जीवनात सत चा किंवा ध्येयाचा विसर पडणे, हा जो विस्तृत अर्थ विवेचनातून येतो तो मनाला भिडतो.

व्यावहारिक उदाहरणांची चपखल जोड दिल्याने बोजड वाटत नाही. आपलेच अनुभव वाटतात. अध्यात्म हा विषय बऱ्याचदा आपल्याला आकलनापलीकडचा वाटू शकतो, पण आपण दिलेली उदाहरणे अतिशय व्यावहारिक आहेत. जसे विद्यार्थ्यांचे ध्येय आणि अभ्यास गायकाचा रियाज आणि पथ्यपाणी या दैनंदिन उदाहरणांमुळे दक्ष असणे म्हणजे काय, हे चटकन समजते. साधना ही सुद्धा एका कलाकारासारखी किंवा विद्यार्थ्यासारखीच सातत्यपूर्ण असावी लागते, हे यातून सुंदर स्पष्ट झाले आहे.

आधुनिक जीवनशैलीवर अचूक बोट ठेवले आहे. याचेही नित्य दर्शन घडते. ''आजकाल सगळ्या गोष्टी आपण अतिशय घाईने उरकतो. भगवंताची पूजा, नामस्मरण यासारख्या गोष्टी रोजचा उपचार म्हणून उरकल्या जातात.'' हे विधान आजच्या फास्ट-फॉरवर्ड युगाचे जळजळीत वास्तव मांडते. आपण अनेकदा यांत्रिकपणे गोष्टी करतो, त्यात भाव नसतो. उपचार आणि समर्पण यातील फरक अत्यंत चोखपणे दाखवून दिला आहे. स्वसंवाद म्हणजे लेखनाची जिवंत बाजू आहे. यामुळे नुसते वाचन होत नाही. तर स्वयं मूल्यमापन केले जाते. या संपूर्ण लेखाचा सर्वात आवश्यक व महत्वाचा भाग आहे. आपण खरंच वेळ वाया घालवतोय का? आपली भक्ती केवळ फॉर्मॅलिटी आहे का? हे प्रश्न स्वतःशीच एक छोटी उजळणी करून घेतात. हे प्रश्न म्हणजे साधकांसाठी दिशादर्शक आणि सामान्य वाचकांसाठी जीवन जगण्याची कला शिकवणारे आहेत.




जसे हे विवेचन वाचत जातो, तसे विचार बदलत आहेत. सगळ्या व्यस्तपणात सुद्धा सतत नामस्मरण चालू असावे, असे वाटते. जसे मालिका, चित्रपट यात सतत चालू असते. आणि ते मुख्य प्रसंगाला अडथळा आणत नाहीत तर पूरक असतात. तसेच हे नामस्मरण असावे.

भाषेचा ओघ, विचारांची स्पष्टता आणि मांडणी अतिशय परिपक्व आहे. सोप्या भाषेतील लेखन सगळेच सोपे करुन सांगत आहे.

पुढील भागांची उत्सुकता!

# मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत

**ज्योतिर्मय साहित्य**

शिक्षणाची भाषा कोणती असावी यावर आपल्याकडे गेली अनेक वर्ष विचारमंथन सुरू आहे. केवळ समाजातच नव्हे तर घराघरांत यावर चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वाद विवादच म्हणा कारण आईवडील, नातेवाईक, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये याबाबत मतभिन्नता आढळते. शिक्षणासाठी कोणते माध्यम वापरावे याबाबत तर्कशास्त्र वापरले जात नसल्याने मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यमवर्गीयांचा गोंधळ उडतो. विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळा जशा वाढू लागल्या तसा हा गोंधळ जास्त होऊ लागला. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून सर्वसामान्य माणूसही आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करू लागला. पूर्वी शहरी भागापूरते असणारे हे लोण आता ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील गरीब, कष्टकरी पालक कर्ज काढून उधार उसनवारी करून लाखो रुपयांच्या देणग्या भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करीत आहेत. मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम शिक्षण म्हणून निवडणे यात पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच गरजेचे आहे का? इंग्रजी शिकण्यासाठी संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेणे योग्य आहे का? याचा विचार पालक करत नाहीत. मातृभाषेतून शिक्षण घेऊनही चांगले इंग्रजी शिकता येते हेच पालक विसरत चालले आहे. मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा मुलाला तो आईच्या पोटात असल्यापासून ऐकायला मिळते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलाची मानसिक वाढ परिपूर्ण होते कारण ते मूल ज्या वातावरणाचा भाग आहे त्या वातावरणाचे प्रतिबिंब त्याला मातृभाषेत दिसते त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची आदर्श पद्धत आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची रुजवन फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात माय, माती, मातृभाषा आणि मातृभूमी यांचे अनन्यसाधारण महत्व असते. माय जन्म देते, माती भरण पोषण करते, मातृभूमी आसरा सुरक्षा देते आणि मातृभाषा योग्य संस्कार करते. या संस्काराच्या शिदोरीवरच प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध होते.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

म्हणून किमान प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवर तरी शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असली पाहिजे असे अनेक भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील संस्था ओरडून सांगत आहेत. सुरवातीला एकदा मातृभाषेतून मूलभूत शिक्षण घेतल्यावर नंतर इंग्रजी अथवा इतर परकीय भाषा गरजेनुसार आत्मसात करणे, त्यांचा काळ परिस्थितीनुसार वापर करणे यास कोणाचीही काहीही हरकत असण्याचे कारण नाही. शिक्षण प्रणालीतून असे शिक्षण दिले पाहिजे की शिक्षण घेऊन बाहेर पडेल त्याला तो राहत असलेल्या प्रदेशातील पर्यावरणाची जाणीव असेल, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय जबाबदारीचे त्याला भान असेल देशाला भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने ओळखून त्याचा सामना करण्यास तो समर्थ असेल. **(क्रमशः)**

# पद्मश्री दया पवार


**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

दया पवार यांच्या मृत्यू नंतर त्याच्या स्मृती प्रित्यर्थ दया पवार सांस्कृतिक व सामाजिक ट्रस्टची स्थापना करण्यात आली. त्यांच्यामार्फत दरवर्षी निवड केलेल्या साहित्यिकास पुरस्कार दिला जातो. या ट्रस्टमध्ये त्यांच्या पत्नी हिराताई पवार अध्यक्षा असून मुलगी प्राध्यापक प्रज्ञा पवार या कार्याध्यक्ष आहे व मुलगा प्रशांत पवार सचिव म्हणून काम बघत आहेत.

दया पवारांची धरण एक प्रसिद्ध कविता....

ही अत्यंत भावुक आणि हृदयस्पर्शी कविता धरणग्रस्त आणि विस्थापित कष्टकरी महिलेच्या वेदनेचे जिवंत वर्णन आहे, जिथे विकासाच्या नावाखाली स्वतःचे सर्वस्व गमावणाऱ्या गरिबाचे दुःख मांडले आहे. या ओळींमधून इतरांच्या कल्याणासाठी धरण बांधताना स्वतःचे मरण ओढवून घेणारी, उन्हात काम करताना तान्हुल्याला पाटीखाली ठेवणारी आणि कष्टाच्या फळापासून वंचित राहिलेली आई दिसत आहे.








बाई मी धरण, धरण, धरण बांधीते
माझं मरण, मरण, मरण कांडीते, न बाई मी धरण...
झुंजमुंजु ग झालं
पीठ जात्यात आटलं
कणी कोंडा ग, कोंडा ग कोंडा मी रांधिते, न बाई मी धरण...
दिस कासऱ्याला आला
जीव मागे घोटाळला
तान्हं लेकरू, माझं लेकरू, पाटीखाली मी डालते, न बाई मी धरण...
काय सांगू उन्हाच्या झळा
घावाखाली फूटे शिळा
कढ दाटे, कढ दाटे, पायी पाला मी बांधिते,
न बाई मी धरण...
पेरापेरात साखर
त्यांचं पिकलं शिवार
घोटभर पाण्यासाठी सारं रान धुंडाळीते,
न बाई मी धरण...
येल मांडवाला चढे
माझ्या घामाचे ग आळे
माझ्या अंगणी, माझ्या अंगणी,
पांचोळा ग पडे, न बाई मी धरण...

# टि ई टी परिक्षा; शिक्षक संभ्रमित?

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

सर्वोच्च न्यायालय. देशातील नागरिकांवर जर अत्याचार होत असेल, तर त्या अत्याचारावर दिलासा देणारी व्यवस्था. त्या न्यायालयाला कोणत्याही गोष्टीवर कोणत्याही स्वरुपाचा निर्णय घेता येतो, देता येतो की जो हिताचा असतो. तसंच प्रथमिक शिक्षक ही अशी व्यवस्था की ज्या व्यवस्थेच्या हातात देशाचं भविष्य असतं. देशाचं भवितव्यही असतं. ती व्यवस्था देशासाठी उत्तम नागरिक घडवत असते, अगदी तन, मन, धन वापरुन. त्यातच वाढ करुन ही व्यवस्था साम, दाम, दंड यासारख्याही पुर्वी गोष्टी वापरायचे आपल्या हातातील भविष्यांना अगदी सर्वगुणसंपन्न करीत असतांना. आता शासनानं त्यांच्याकडून दंड आणि दाम काढून टाकले आहे, केवळ साम या पद्धतीचाच वापर करा. असा फतवा काढला आहे. तरीही शिक्षक नावाच्या व्यवस्थेची ओरड नाही आणि नव्हतीच. तरीही काही काही शाळेत शिक्षण दामाचा वापर करतातच. ज्यातून स्वतः शिक्षक गरीब विद्यार्थ्यांना गणवेश घेवून देतात. कोणी टुस्तके घेवून देतात. परंतु त्यांना सखोल ज्ञान देतातच. ज्यातून त्यांना हातातून घडणारं भविष्य. त्या भविष्यानं सोनं होतं. ज्यातून कोणी संशोधक, कोणी न्यायाधीश, कोणी राष्ट्रपती तर कोणी पंतप्रधान होतात. या सर्वांना घडविणारी व बनविणारी शिक्षक नावाची व्यवस्था, त्यांच्याकडे असलेली जबाबदारी अगदी इमानीइतबारे पार पाडते, त्यांच्याकडून एकही रुपया न घेता. देशाच्या भविष्याकडून पैसा शिक्षण शुल्क म्हणून तेच घेतात आणि घेत आहेत, जे शिक्षक नाही. असे असतांना सध्या न्यायाधीश, अन् तेही सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश शिक्षकांना अपात्र आहेत असं संबोधून त्यांना पात्र ठरविण्यासाठी टि ई टी द्यावी म्हणतात. ते योग्य नाही. अन् त्याबद्दल उघडपणं बोलणं हा न्यायीक अपमान जरी असला तरी प्राथमिक शिक्षक तशा प्रकारानुसार वक्तव्य करु लागले आहेत. ज्यातून खरंच न्यायालयाचा अवमान होतो आहे. आज फेसबुकवर, इन्ट्राग्राम व मिडीयावर या स्वरुपाच्या कितीतरी कमेंट आहेत. ज्यातून सर्वोच्च न्यायालय बदनाम होत आहे.




सर्वोच्च न्यायालय. त्यांचं एक वेगळं असं महत्व आहे. तरीही शिक्षक बोलतात आहे, सर्वोच्च न्यायालयाबद्दल काहीबाही. कारण जो गुन्हे करतो, त्याला गुन्हेगार समजलं जातं. तसाच गुन्हेगार हा अन्याय सहन करणाऱ्यांनाही समजलं जातं. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश महोदयांनी दि. २९ जुलैला दिलेल्या निर्णयानुसार खरंच शिक्षकांवर अन्याय झाला आहे. कारण त्याच निर्णयानुसार आज जे कार्यरत शिक्षक आहेत. ते पात्र जरी असले तरी त्यांना अपात्र ठरवले गेले आहे. हा निर्णय म्हणजे नोकरीवर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्या अनुभवाची हत्याच आहे. शिवाय असा सर्वोच्च न्यायालयाकडून निर्णय येणे म्हणजे त्यांचे जे महत्व देशातील प्राथमिक शिक्षकांना आतापर्यंत वाटत होतं. ते पुढं वाटणार नाही. याबाबतीत शंका येते. कारण ही टि ई टी परिक्षेची सक्ती म्हणजे आजच्या काळातील पात्र व अनुभवसंपन्न असलेल्या शिक्षकांना अपात्र ठरविणारी कृती आहे. असंच शिक्षकांचं म्हणणं आहे. यातून शिक्षकांच्या मनात सर्वोच्चच नाही तर कोणत्याही न्यायालयाबाबत भीती निर्माण झालेली असून सांशकता व संभ्रमताही निर्माण झाली आहे. ही गोष्ट जणू देशातील लोकशाही संपत चालली की काय? असंच वाटणारी असून ज्यातून पुढील काळात सर्वोच्च न्यायालयावरही कोणी विश्वास ठेवू शकणार नाही. असंही या शिक्षकांना वाटते. हे तेवढंच खरं.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559